Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 894 – 899
DOI: 10.5281/zenodo.10282518

**Original Research Article**

# 'एकदश व्रत' : गांधीजीची नैतिक जीवन पद्धती

डॉ. शितल येरुळे

तत्वज्ञान विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: shital.yerule@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

जगाच्या आणि विशेषतः भारताच्या इतिहासात सुदैवाने विसाव्या शतकात एक महापुरुष जन्माला आला उद्याला जो नि:संकोचपणे जगाला सांगु शकला,'माझे जीवन हाच माझा संदेश आहे' त्या महापुरुषाचे नाव मोहनचंद करमचंद गांधी. जी तत्त्वे त्यांना योग्य वाटली ती त्यांनी प्रथम आचरणात आणली आणि त्यात अपयश आले तर जाहीरपणे त्यांनी कबुनही केले त्यांचे जीवन जणु त्यांनी एक उघडे पुस्तक बनविले आणि त्यातील मजकुर कोणीही वाचावा आणि धडा घ्यावा. अनेकांनी तो जीवनग्रंथ वाचला आणि आपपल्या कुवती प्रमाणे त्यातून बोध घेऊन आपल्या जीवनात उत्तरविण्याचा प्रयत्न केला आणि वर्तमान परिस्थीतीतही होत आहे. अनेक पिढ्यांना त्यातून प्रेरणा व स्फुर्ती मिळत राहणार आहे.

## उद्देश्य

प्रस्तुत लेखाचा उद्देश्य केवळ गांधीजीचे तत्त्वज्ञान सांगणे नसुन त्यांस त्यांनी सांगीतलेल्या अकरा व्रत्तापासून कोणता आदर्श आपण घेऊ शकतो, हे सांगणे आहे. गांधीनी सांगीतलेली हे अकरा व्रत म्हणजे एकादश व्रत एक शिस्तबद्ध जीवन जगण्याची, नैतिक जीवन जगण्याची आचरण पद्धत आहे.

## व्याप्ती

प्रस्तुत संशोधन लेखात केवळ गांधीजींच्या एकादश व्रताचा उल्लेख केला आहे.

## गांधीजींचे एकादश व्रत

गांधीजींनी एकादश (अकरा) व्रताचा स्वीकार केला. गांधीजीनी दैनंदिन प्रार्थनेत या अकरा व्रताचा समावेश केला होता. ही अकरा व्रते पुढील प्रमाणे आहेत.

1) सत्य 2) अहिंसा 3) निर्भयता 4) नम्रता 5) ब्रह्मचर्य 6) अपरिग्रह 7) व्यायाम 8) अस्वाद 9) सर्वधर्म समभाव 10) स्वदेशी 11) अस्पृश्यतेचा त्याग

निर्भयता या तत्त्वाला गांधीजी महत्व देतात, अधारभूत तत्त्व म्हणतात त्यांच्या मते निर्भयतेमुळे इतर व्रताचे पालन सहज होऊ शकते. गांधीजींच्या या एकादश व्रताचे सविस्तर विवेचन पुढील आहे.

एकादश व्रत:

**१.** सत्य

सत्य निष्ठा ही गांधीजींच्या जीवनाच्या प्रारंभापासुनच होती. गांधीजी रुढ अर्थाने अस्तिक होते, ते मुर्तीपुजक नसले तरी निराकार ईश्वराचे उपासक होते. रामनामावर त्यांची नितांत मब्दा होती इतके असुनही त्यांनी आपल्या जीवनात सत्याला सर्वप्रथम स्थान दिले आहे ते म्हणत

" माझ्या मते सत्य हे सर्वश्रेष्ठ आहे त्याच्यात अगणित. गोष्टींचा समावेश होतो. सामान्यपणे सत्य बोलणे इतकेच आपण सत्य समजतो पण मी व्यापक अर्थाने 'सत्य' हा शब्द योजला आहे. विचारांमध्ये, आचारात आणि उच्चारांमध्ये जे सत्य तेच सत्य हे सत्य म्हणजे कल्पनेत असलेले सत्य नाहीं तर स्वतंत्र, चिरस्थायी, सत्य म्हणजे परमेश्वर आहे'

यापुढे गांधीजी म्हणतात, 'लहानपणापासुनच मी सत्याचा उपासक आहे. माझ्या बाबतीत ती अत्यंत सहज अशी गोष्ट होती . भक्तीयुक्त अंतकरणानानें केलेल्या शोधाड़ांती 'ईश्वर सत्य आहे' या प्रचलीत सुगाऐवजी 'सत्य हाथ परमेश्वर' हे वस्तुनिष्ठ मर्म प्रगर करणारे मर्म, सुग मला मिळाले. तथा सत्याचा शोध व त्याचा आग्रह हेव गांधीजींचे जीवनकार्य बनले. महात्मा गांधीजी असे म्हणतात, 'जे आज मला न्याय व इनक योग्य वाटत असेल की ते करताना, मान्य करताना किंवा प्रगट करताना मला यत् किचीतही शरम वाटणार नाही. जे करण मला भाग आहे आणि ते जर केलं नाही तर मला उजळ माश्यान जगता येणार नाही, ते माझ्या बाबतीत सत्य होय.

' गांधी जी अजिवन, अविमांत सत्याचा शोध करीत होते. जस आणि जेवढ सत्यं समजेल त्याप्रमाणे दृढनिश्चयाने आवरण करणे यालाच म्हणत सत्याचा आग्रह अस गांधीजी म्हणत.

**२.** अहिंसा

महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्त्वाबदल जेवढी उलटसुलट चर्चा झाली तेवढी दुमचा कोणत्याच तत्त्वाबदल झाली नसेल गांधीजींचा अहिंसा तत्त्वबदल पुष्कळ अंशी गैरासमज पसरविले गेले होते. ते काही अंशी आजतागायत कायम आहेत.

गांधीजींची अहिंसेवर तत्त्व म्हणून श्रद्धा होती जग अहिंसेच्या मार्गाने गेले तरच त्याला चिरशांतता लाभेल असे त्यांना वाटत होते. हिंसेकडून अहिंसेकडे जाणे हाच मानवाचा विकास आहे. गांधीजींच्या आधी भारतात बौद्ध-जैनासारखे संप्रदाय होऊन गेले ज्यांनी अहिंसा मार्गाचा स्विकार केला. परंतु गांधीजींची अहिंसा ही परंपरागत अहिंसेपेक्षा वेगळी होती. गांधीजींची अहिंसा भ्याडपणाची नव्हती तर शुराची अहिंसा होती- या बाबतीत ते म्हणतात.

"मी मानीत असलेला अहिंमा धर्म ही परकष्टोची क्रियाशील शक्ती आहे. त्यात भ्याडपणा किंवा दुर्बलतेला स्थान नाही. हिंसक माणूस कधी न कधी अहिंसक बनेल पण दुर्बल व्यक्तीच्या बाबतीत ही शक्यताच नसते. म्हणून आम्ही सांगतो की अमचा, आमच्या स्त्रीयांचा व आमच्या पुजस्थानाचा बचाव आत्म- क्लेशाच्या म्हणजे अहिंसेच्या बळावर कसा

करावा याचे ज्ञान नसेल तर आणि मर्द असुन तर लढाई करून त्यांचे रक्षण करण्याची शक्ती तरी निदान आपल्यात असली पाहीजे'

थोडक्यात गांधीजींची अहिंसा संकल्पना जीवाला न मारणे इतकीच मर्यादित नाही. ती संकल्पना सत्या इतकीच व्यापक आहे अशा अहिंसेची झाल्याशिवया सत्याची सिद्धी होत नाही, पूर्ण सत्य आणि पूर्ण अहिंसा यात भेद नाही तरी समजण्याच्या सोयी करता सत्य साध्य आणि अहिंसा साधन आहे सत्य आणि अहिंसा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**३.** निर्भयता

गांधीजी निर्भयतेला खुप महत्व देत होते. गांधीजींनी भारताला दिलेली महत्वाची देणशी म्हणजे निर्भयतेची शिकवण. ही शिकवण भारताने पुणगाने आत्मसात केली असे म्हणता येणार नाही पण त्या दिशेने जाण्याचा मार्ग दाखवला. अधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असणा-या सरकार कुठे आपण उसे टाकु शकतो, याचा विश्वास त्यांनी शेतकरी, सामान्य माणूस, कामगार स्त्रीयांमध्ये निर्माण केला यासाठी त्यांनी सत्याग्रहाचा आधार होतला. आणि या द्वारे त्यांनी निरासा लढा यशस्वी करून दाखवला हे त्यांच्या निर्भयतेची साथ देतात.

**४.** नम्रता

नम्रतेत अहिंसेचा अंश असतो असे म्हणता - येईल- आपली मर्यादा जाणणं व त्यातच राहण हे नम्रतेच लक्षण आहे अस गांधीजी सांगतात. नम्र मनुष्य जगातील सारी काम आवरण्याची धडपड करणार नाही, तो आपली मर्यादा ओळखेल आणि ती आटोपेपर्यंत तो तीच्या बाहेर पाऊल टाकणार नाही. सत्य, अहिंसा, ब्रहमच्छर्य व्रताचा पालन करणारा साहाक या व्रतपालनाच्या आपली शक्ती आदर्शच्या मानान किती अल्प आहे हे पाहिल तर तो सहजच नम्र राहिल. आदर्श गाठण्याच्या बाबतीत आपल्यात असलेल्या उणिवेविषयी नम्र मनुष्य आंधळा राहणार नाही. ही उणीव तो निरविलासवणे कबुल करीत पण तीचा बचाव करण्याच्या मोहात तो पडणार नाही, असे गांधीजी म्हणतात.

**५.** अपरिग्रह

अपरिग्रह याचा अर्थ आपल्या गरजा मर्यादित ठेवणे. गांधीजींनी आपल्या व्रतांमध्ये अपरिग्रह म्हणजे काटकासर युक्त जीवनाला विषेश महत्त्व दिले आहे. गांधीजी उच्च शिक्षणासाठी लंडन मध्ये गेले होते तेव्हा तिबल्या उच्चशाणीमानाने त्यांचे डोळे दिपुन गेले आणि त्या पद्धतीने जगण्यास सुरुवात केली परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की आपला भाऊ खुप कष्ट करून आपल्याला मिळवत आहे तेव्हा त्यांनी आपल्या खर्चावर नियंत्रण आणले. अफ्रिकेतही गेल्यावर अत्यंत काटकसरीचे व्रत पुन्हा चालु ठेवले ते स्वतःचे कपडे स्वतः धुवत आणि स्वतः इस्त्री करत. कागद व लिफाके या बाबतीतही त्यांची काटकसर प्रसिद्ध आहे. त्यांना जी पत्र येत त्याची पाठकोरी बाजू काढून ठेवत त्याचा वापर ते लिखाणासाठी करत होते. गांधीजीची काटकसर अपरिग्रह लोकांना विक्षीणपणाची वाटे. परंतु त्यांची काटकसरीची शिकवण भारताला इतर देशाकडे मदत मागण्याची वेळ येऊ देणार नाही, हे आपण ओळखले पाहीजे.

गांधीजींनी केवल वैयक्तिक जीवनात अपरिग्रह व्रताये पालन केले नाही तर सार्वजनिक जीवनातही काटकसरीच्या व्रताचे पालन केले गांधीजींनी आपल्या हयातीत अनेक सार्वजनिक नीची उभा केले आणि खर्चही केले पण त्यातील प्रत्येक पैशाचा हिशोब त्यांनी ठेवला आणि त्याचा काटकसरीने वापर करणे ही दोन वध्ये त्यांनी अगदी कठोरपणे पाळली. या बाबतीत त्यांची शिस्त आत्यंत कडक होती.

**६.** आस्वाद

गांधीजी असे महणतात की मनाक्लेष जेव्हा दुरन करण्याजोगे असतील तेव्हा उपवास व प्रार्थना करावी माझा धर्म सांगतो. उपवास हे माझ्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. स्वतःच्या व इतरांच्या शुद्धीसाठी उपवास करण ही युगानुयुगे चालत आलेली प्रथा आहे. उपवासाशिवाय प्रार्थना असु शकत नाही आणि प्रार्थनेशिवाय उपवास असु शकत नाही,"गांधीजींनी आपल्या जीवनात मर्यादित आहाराला महत्व दिले आहे. गांधीजी याबाबतीत कुठे अस म्हणतात, 'माझ्या करमणुकीसाठी मी उपवास करत नाही. किंवा किर्तीच्या हव्यासाने मी उपवास करत नाही. उपवासानं होणाऱ्या भुकेच्या यातना आणि इतर अनेक कपट मी सहन करीत असलो तरी त्यापासून मला होणाऱ्या यातना आनंदान सहन करतो. मला हे उपवास सहन होतात. हे उपवास मला सुसहय होतात कारण खडच आहे की ते कामहान शक्तीकडून माझ्यावर लादले जातात व सहनती होतात. ते मला सामर्थ्य देतात, शक्ती देतात गांधीजीनी उपवासाला सत्याग्रहाच साधन मानले आहे

७. ब्रह्मचर्य

गांधीजींच्या मते अहिंसेच्या वाचून सत्याची सिद्धी नाही तशी ब्रह्मचर्यापासून अहिंसेची सिद्धी शक्य नाही. ब्रह्मचर्य म्हणजे वीर्यरक्षण किंवा कामजय एवढेच नव्हे तर त्यात सर्वच इंद्रियाचा संयम असणे आवश्यक आहे जीवतात संपूर्ण ब्रह्मचर्याच पालन काय-वाचा-मनानं करण आवश्यक आहे अध्यात्मिक परिपूर्णतेसाठी ते आवश्यक आहे अस गांधीनी म्हणतात त्यांच्या मते 'संपूर्ण त्याग आणि संपूर्ण ब्रहमचर्य आदर्श व्यवस्था आहे. ते मनात आणण्याचे धाडस नसेल तर विवाद आवश्य करा. तरी त्यात देखील संयमाच जीवन आवश्य घालवा. तुम्ही एकमेकामकडे वस्तु म्हणून पाहता कामा नये.

८. व्यायाम

गांधीजींनी भारताला शिकवलेची एक गोष्ट म्हणले शरीस्मम किंवा शरीरममाया प्रतिष्ठा, अपरिभ्राचा आदर्श असलेल्या भारतीय संस्कृतीसमोर शरीरश्रमाला महत्वाचे स्थान होते. राजा असो वा रेक, ब्राह्मण असो वा शुद्र प्रत्येकाला शरीरकामाने चरितार्थ चालवावा लागतो गांधीजी म्हणतात 'लहानपणापासून ज्याला भरपुर शारीरिक मम करावे लागतात त्याला आखाड्यात जावून मेहनत करण्याची मुलीच गरज नाही आखाड्यातली मेहनत ही मुख्यात्वे करून बैठा धंदा किंवा उदरनिर्वाहासाठी मकलगीरी करण्यासाठी आहे " गांधीजीनी संघ कवायतीला महत्व दिले आहे. सात्विक व्यायामात चालण्याच्या व्यायामाला विशेष महत्त्व दिले आहे याला त्यांनी 'बायामाचा राजा' म्हटले आहे याखेरीज आसन आणि प्राणायाम देखील व सात्विक व्यायाम आहेत. व्यायामाचा उद्देश शरीराला भोगी बनवको नाही तर शरीर निरोगी राहण्यासाठी याची गरज आहे असे गांधीजी म्हणतात.

९. सर्वधर्म समभाव

सामाजिक व आर्थिक समता हा सर्व व्यक्तीच्या परवनीया' विषय आहे परंतु त्याचा अर्थ फार थोड्या लोकांना समजला त्यापैकी गांधीजी होते. सामाजिक समता म्हणजे जाती - जमातीमधील विषयता दूर करणे. हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठी गांधीनी जे प्रयत्न गांधीनी त्याच्याकडे एका विशाल दृष्टिकोनातून पाहिले पाहीजे केवळ इंग्रजांना टकलून लावण्यापुर्ती त्यांची मैगी नवृत्ती, तर जीवन विकासाचे साधन होते. गांधीनी आपल्या आत्मीय प्रार्थनेत त्व सर्व धर्माच्या निवडक प्रार्थनांचा समावेश केला होता. सर्व धर्म मुलतः निर्दोष असतात त्यांची तत्त्वे मुलतः एकच असतात ही गोष्ट लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले.

गांधीजींच्या सर्वधर्म समभाव संकल्पने वर खुप टिका केली जाते. गांधीला हिंदू धर्माबद्दल अभिमान आदर वाटत नाही, परंतु हे सत्य नाही, गांधीजी अस म्हणतात की, "स्वतः ला हिंदू समजण्यात मला अभिमान वा न वाटतो कारण ही संकल्पना अत्यंत व्यापक आहे. पृथ्वीच्या कोप-याकोप-यात असणाऱ्याण प्रेषितांच्या शिकवणी सहन करण्याची ताकत यामुळे मला मिलते. 'गीता' हा ग्रंथ माझा श्वस आहे माझा जीवनग्रंथ आहे.

धर्मातर अधुनमधुन जळमटे साचत असतात, ती काढून टाकण्यासाठी महापुरुष जन्माला येतात या पैकी गांधी हे महापुरुष होते. त्यांनी धर्मातील कालबाहय गोष्टी नाहीशा करून त्याला तेजस्वी बनवावे या हेतूने जातीभेद स्त्रीदास्य यासारख्या दोषांवर कडून टिका केली.

**१०.** अस्पृश्यतेचा त्याग

1921 साली गांधीजींच्या प्रेरणेतून राष्ट्रीय शिक्षणासाठी अहमदाबाद येथे गुजरात विद्यापिठाची स्थापना झाली होती, विद्यापिठाला पैशाची आवश्यकता होती मुंबईतील काही वैष्णव घनिक गांधीजी- कडे आले आणि ते म्हणाले,' आपण मागाल तेवढे पैसे देती परंतु विद्यापिठात अस्पृश्यंना प्रवेश देवू नका' यावर गांधीजी म्हणाले, 'विद्यापिठाच्या निधिची गोष्ट सोडा उद्या जर मला कोणी म्हणाले की अस्पृश्यता कायम ठेवण्याच्या अटीवर देशाला स्वराज्य देतो तर ते देखील मी घेणार नाही.'

गांधीजीच्या अस्पृश्यता निवारण्याच्या भावना किती तीव्र होत्या हे यावल समजते. अस्पृश्यता हा आपल्या देशावरील कलंक आहे व तो धुवून काढण्यासाठी स्वतःच्या प्राणाचेही मोल दिले तरी चालेल असे गांधीजींना वाटत होते. अस्पृश्यांना वेगला मतदार संघ देण्याच्या सरकारच्या धोरणाचा त्यांनी कडाडून विरोध केला. स्वातंत्र्य मिळाल्या नंतर ही गांधीजीची ही तळमळ कमी आली नाही, दिल्लीतील भंगी वस्तीत मालेच्या मायंप्रार्थने नंतर न झालेल्या प्रवचनात गांधी म्हणाले होते, "एखादया मंग्याची मुलगी या राष्ट्राची पहिली अध्यन कार्या◌ी, अशी आस मला वागुन राहिली आहे." अंगी ता अस्पृश्यातला अस्पृश्य. त्याचा उदार होईल तेव्हाच समाजाचा उद्धार होईल असे गांधीजीचे मत होते

**११.** स्वदेशी

कोणत्याही देशाचा उघ्दार व्हावयाचा असेल तर त्याने आर्थिक बाबतील स्वावलंबी असले पाहीजे गांधीजीच्या काळात अनेक नेत्यांनी याकरीता प्रयत्न केले. गांधीजीच्या काळात स्वातंत्र्य चळवळीला जसा जोर चढत होता तसतसे स्वदेशीचे महत्त्व वाढत होते याचे कारण म्हणजे गांधीजीनी प्रत्येक गोष्टीम स्वदेशीचा जाग्रह धरना स्वदेशीचे अधिक परिणीत स्वरूप म्हणजे खादी व ग्रामोद्योग भारताची आर्थिक व सामाजिक रचना ग्राम प्रधान आहे त्यांनी भारताला खादीची शिक्षा दिली त्याद्वारे जण त्यांनी भारताला स्वावलंबनाचा घडा दिला, यामुळे जेव्हा त्यांनी मुलोदयोगी शिक्षणाची कल्पना मांडली तेव्हा त्यांनी चरख्याला शिक्षणाचे माध्यम मानले त्याला केंद्रस्थान दिले.

स्वदेशीच्या आग्रहातूनच त्यांनी स्वभाषेचा आग्रह धरला. भाषांच्या बाबतीत आपला देश संपन्न आहे या भाषांना शेकडो वर्षांची परंपरा आहे लोकभाषांना ज्यांत स्थान त्यांनी मिळवून दिले अपरिहार्य परिस्थीतीत इंग्रजीया वापर करावा असे ते म्हणत. इतर वेळी प्रांतीय भाषाच वापरली जावी असे गांधीजी म्हणत.

गांधीजीच्या एकादश व्रताच्या म्हणजे अकरा प्रतीच्या) विवेचनाकल असे लक्षात येते की गांधीनी या बचा ही व्रत सर्वप्रथम स्वतः अंगिकाराली होती. त्याचे पालन त्यांनी स्वतःच्या जीवनात केले. गांधीजींनी आपल्या आचरणातून एक आदर्श समाजाच्या समीर, राष्ट्राच्या समोर निर्माण केला. त्यांचा प्रत्येक संदेश त्यांनी स्वतःच्या कृतीत उत्तरवला कर

त्यामुळे गांधीजी हे बोलणारे व्यक्ती नव्हते तर रु. कृतीद्वारे आपल्या विचाराची छाप जनमानसावर आदर्श व्यकती. म्हणुनच ते 'महात्मा' होते, टाकणारे "राष्ट्रपिता' होते.

**संदर्भ सूची**

१. महात्मा गांधी (पर्व 6 आणि 9 ):- आरविंद ताटके
२. महात्मा गांधी जीवन आणि शिकवण:- श्रीपाद जोशी
३. गांधी:- नलीनी पंडित
४. म. गांधी गौरव ग्रंथ संपादक:- दा. न. शिखरे
५. गांधी विषयी (गांधी विचार आणि समकालीन विचार विश्व) (खंड-2) :- अशोक चौसाळकर